प्रेसनोट दि ३१/०३/२०१९

## कोथरुड पोलीस स्टेशन पुणे शहर

## अल्पवयीन मुलीस सुखरुप तिचे आईवडीलांचे ताब्यात दिलेबाबत

दि २८/०३/२०१९ रोजी १२.३० वा चे सुमारास किश्कींदानगर मार्शलवरील कर्मचारी पो शि ९११५ कुंभार व पो शि ९११९ पटेल हे किश्कींदानगर कोथरुड पुणे याठिकाणी पेट्रोलिंग करीत असताना चाळ नं ३ भागात साधारणता एक वर्षाची मुलगी ही रडत असताना मिळुन आल्याने सदर मुलीला ताब्यात घेतले. सदर मुलगी ही लहान असल्याने व रडत असल्याने तिला तिचे आईवडीलांबाबत काहीएक माहीती सांगत नव्हती. त्यामुळे मार्शलवरील नमुद कर्मचारी यांनी नमुद मुलीस आजुबाजुस असलेले दुकानदार, रहीवांशी यांना दाखवुन तिचे आईवडीलाबाबत माहीती विचारली त्यावेळी सदर भागात राहणारे एका इसमाने सदरची मुलगी ही बिहारी असावी व बिहारी लोक हे चाळ नं ११ मध्ये रहावयास असलेबाबत माहीती दिल्याने मार्शवरील कर्मचारी हे मुलीसोबत चाळ नं ११ किश्कींदानगर कोथरुड पुणे याठिकाणी जावुन त्याठिकाणी विचारणा केली असता नमुद मुलीचे आईचे नाव पार्वती विश्वकर्मा रा किश्कींदानगर कोथरुड पुणे व सदर मुलीग हि दिड वर्षाची असुन मुलीच्या घरी जावुन तिस तिची आई नामे पार्वत विश्वकर्मा हीचे ताब्यात सुखरुप दिले आहे.

अशा प्रकारे किश्कींदानगर मार्शलवरील कर्मचारी पो शि ९११५ कुंभार व पो शि ९११९ पटेल यांनी उत्तम कामगिरी केली आहे.

